## पद्मश्री डॉ. शरदकुमार दीक्षित



जेव्हा हृदयस्पंदनांची साथ संपते तेव्हा
जी व्यक्ति निजधामाला निघून जाते, त्या व्यक्तीच्या,
आदर्शवत, प्रेरणादायी स्मृतींना
मानाने जपण्याचे अगत्य जाणवू लागते
दुर्दम्य इच्छाशक्तीचे धनी, धन्वंतरी, शल्यविशारद
ज्यांच्या संवेदनाक्षमतेत
मला एक ध्येयवादी सौंदर्यविशारद दिसला
त्या डॉ. शरदकुमार दीक्षितांच्या स्मृतींना
मानवंदना देण्यासाठी माझी ही
भावपूर्ण
स्मृती श्रध्दासुमनांजली

उषादेवी विजय कोल्हटकर.

## सौंदर्यविशारदाच्या सुस्वरुप जाणिवेची सुस्वर यात्रा



पद्मश्री डॉ. शरदकुमार दीक्षित यांना, त्यांच्या वैद्यकिय क्षेत्रातील मानवीय योगदानाबद्दल, दुबई येथे नोबल पारितोषिकाच्या तोडीचा “The Sheikh Hamdan Award 2002 for Volunteers in Humanitarian Medical Services”, हा त्या राष्ट्रातील बहुमान प्रदान करण्यात आला. ही आनंदवार्ता, २५ ऑक्टोबर २००२ च्या ‘Khaleej Times’ या वृत्तपत्रात वाचली. पुढे लिहिले होते, “दुबई येथील भारतीय समाजाने डॉ. दीक्षितांच्या आत्मिक सौंदर्याला भक्तिभावाने मानवंदना दिली. अभिनंदन शब्दाने, स्वतःचेच अभिनंदन करावे असे भाव मनी दाटले. अभिमान वाटला व प्रकर्षाने जाणवले की डॉ. दीक्षित यांचा ध्येयपथ, पुन्हा एकवार त्यांच्याच प्रयत्नाने प्रशस्त झाला आहे. लहान मुलामुलींचे फाटलेले ओठ, नाक, कान, डोळयांचे तिरळेपण, टाळूला चिकटलेली जीभ, किंवा अपघाताने निर्माण

झालेल्या कुरुपतेवर, विनामूल्य उपचार करुन या लहानग्यांच्या जीवनाला नवे रुप देण्याचे त्यांचे कार्य अमेरिकेतही गौरविण्यात आले होते. या प्लॅस्टीक शल्यविशारदाचा “The Kelogg’s Hannah Neil World of Children Award” देऊन सन्मान करण्यात आला. त्यांना २००१ या वर्षाचे, “NRI of the year Award” ही देण्यात आले होते या वार्तांचे स्मरण झाले. “U.S. based plastic surgeon works for free”, “U.S. based surgeon has performed 66,000 free surgeries”, असे वृत्तपत्रातील लक्षवेधी मथळे नजरेसमोर आले. “Fastest scalpel in the East. Doctor’s free surgeries give poor children in India new faces and new futures” या शीर्षकाचा, १७ डिसेंबर २००१ या तारखेच्या ‘न्यूयॉर्क न्यूजडे’ वृत्तपत्रात प्रसिध्द झालेला बील जेन्सन यांचा लेख आठवला. त्या लेखात त्यांनी लिहिले होते, “.....You don’t need luck when you have got mettle- and the fastest scalpel in the East.” हे वाक्य वाचल्यानंतर विवेकानंदांना अभिप्रेत असलेले वेदान्तिक मन व अंतहीन शक्ती असलेले पश्चिमी हात एकाच व्यक्तीमध्ये असणे संभव आहे का? या प्रश्नाचे उत्तर डॉ. दीक्षितांच्या रुपात मला मिळाले. आदरभावाने शब्दात व्यक्त झालेले मनोभाव वाचल्यानंतर एक प्रश्न मनी आलाच तो असा की, अशा देवदत्त शक्ति, अभिव्यक्ती, शब्दांच्या संकुचित सीमामध्ये सामावता येतात का? ईश्वराकडून काहीही मागायचे नाही, फक्त देवाने आपला सदुपयोग करुन घ्यावा एवढीच इच्छा मनी बाळगून जनसेवेचे कार्य करीत राहायचे हे डॉ. दीक्षितांचे त्यांच्याच विनम्र शब्दात व्यक्त झालेले कर्मयोगीपण विलक्षण बोलके आहे. रेव्ह.नारायण वामन टिळकांच्या पुढील अभंग बोलात, डॉक्टरांच्या जीवन सूत्राचे नेमकेपण प्रगट झाले आहे असे मला वाटते.

“॥ही खरी प्रभुसेवा जनसेवा
मान्य खरोखर देवा
मी कोणी नच म्हणणे
प्रभुला गौरव अवघे देणे॥”

१९६८ पासून प्रत्येक वर्षी ऑक्टोबर ते मार्च या कालावधीत भारतातील विविध ठिकाणी आयोजित केलेली विनामूल्य प्लॅस्टीक सर्जरी शिबीरे, हजारो शस्त्रक्रिया, नवे रुप प्राप्त झालेल्या लहान मुलामुलींचे आनंदलेले चेहरे, अनेक पारितोषिके, पुरस्कार, मानसन्मान या संख्यात्मक मोजमापात डॉ. दीक्षितांच्या कार्याचे मुल्यमापन सामावले आहे का? अर्थात परमेश्वराचा धन्वंतरी स्पर्श, ज्यांच्या जीवनदायी हातांच्या रेषांसह, अस्तित्वाच्या कणाकणात सामावलाय त्या देवेच्छेपुढे समर्पित असणाऱ्या डॉक्टरांना या प्रश्नाच्या उत्तरापेक्षाही कार्य करण्यात व ते पुढे चालू ठेवण्यात स्वारस्य आहे, हे मी जाणून आहे.



व्हीलचेअरच्या पायांनी चालणारी, शरीराच्या उजव्या भागाला अर्धांगवायुचा स्पर्श झाल्यामुळे, ती असहाय्यता सहन करणारी, दोनदा हृदयविकाराचे गंभीर झटके येऊन गेल्यामुळे हृदयाच्या फक्त १७% सहकार्यावर,

स्वतःच्या स्पंदनांना श्वासांची साथ देण्याचा विक्रम करणारी ही व्यक्ती इतका प्रचंड जीवनोत्साह कोठून आणते? मला वाटते त्यांचा आंतरिक शक्तिनिधी, त्यांच्या परमेश्वरावरील दृढ विश्वासामुळे अक्षय आहे. "माझी कृपा तुला पुरे आहे; कारण अशक्तपणातच शक्ति पूर्णतेस येते". या बायबलमधील वचनाचा अर्थ आता मला पूर्णपणे उमगला आहे. कमालीच्या सहृदय व्यक्तीच्या हृदयाने फक्त १७% निरोगी राहावे, व ज्यांच्या हृदयाला संपूर्ण निरोगीपणाचे वरदान मिळाले आहे, अशांच्या हृदयाला साधा पाझरही फुटू नये, या विरोधाभासाला काय म्हणावे? ज्यांच्या जीवनातील कोमल मधुरतेला त्यांच्या संगीतसाधनेने सुस्वर सोबत केली होती, ज्यांच्या ब्रम्हानंद अनुभूतीचा शब्दकोश सा,रे,ग,म,प,ध,नी,सा या नाद ध्वनीत सामावला होता, त्यांना स्वरयंत्राचा कर्करोग व्हावा? त्यांचा सुरेल आवाज इतिहास बनावा? जीवनातील सूर असे अचानक मुके झाले असतील तेव्हा त्यांच्या संवेदनाक्षमतेला काय वाटले असेल, त्या नुसत्या कल्पनेने माझा जीव कासावीस होतो. व्याधींनी त्यांच्याच शरीराला जवळ केले तरीही मनोबलाच्या जोरावर, पूर्ण पाच वर्षांच्या प्रयत्नांनंतर संभाषण शक्य होईल इतपत बोलण्याचे तंत्र त्यांनी पुन्हा अवगत केले. जेन्सन यांनी घेतलेल्या मुलाखतीत त्यांचा आशावाद त्यांच्याच शब्दात लिहायचा झाला तर ते म्हणतात,

"I am still able to work well with my hands. I still have good eyes and good brain. The other option was to stay in a nursing home and wait for death. Death will come, when it comes; why should I wait for it?"

मृत्यु मला तुझी दया येते कारण, तू  माझ्याबरोबरच संपणार आहेस, असा निर्भय दृष्टिकोण नजरेसमोर ठेवून, घराच्या उघडया दारावर मृत्युची वाट पाहाण्याचे काम सोपवून हे शल्य विशारद, सौंदर्य दानाच्या सेवायज्ञात कार्यरत आहेत. स्वतःची काळजी देवाहाती सोपवून जगाची चिंता करणारे हे तपस्वी आपली मुलाखत संपविताना म्हणतात, "I fell down on November 10,2001, broke four ribs, <u>But the world must go on."</u>

डॉ. शरदकुमारांनी अनेक निष्पाप मुलामुलींच्या व्यंगांना सुस्वरुपता बहाल केली. स्वतःच्या वेदना, दुःख, व्याधि व शारीरिक मर्यादा कधी त्यांच्या कार्यात बाधा बनल्या नाहीत. त्यांच्या कार्याच्या मान सन्मानांबरोबर त्यांच्या वेदना व्याधींचाही मानसन्मान झाला. व्यथा, व्याधी, वेदनांना मानाने जगविण्याचे, दुसऱ्यांसाठी प्रेरणा बनविण्याचे कौशल्य किती जणांच्या ठायी असते? शारीरिक मर्यादांसह अविरत कार्यरत राहाण्याचे आत्मबल, कमालीची सहनशीलता कितीजणांची विरासत असते? सप्तसूरांच्या तालावर, तन्मय होऊन भराभर शस्त्रक्रिया उरकणाऱ्या कलावंती बोटांतील चपळता पाहून थक्क होणारे ऑपरेशन थिएटर किती शल्यविशारदांची रंगभूमी बनते? या अनेक प्रश्नांना पाहून, त्यांना नेहमी विचारला जाणारा प्रश्न, मला आठवतो आहे, "डॉ. दीक्षित आपल्याला एकाकीपणा जाणवतो का?" त्यावर त्यांचे उत्तर असते, "संगीत प्रेमी कधीच एकाकी नसतात." डॉ. शरदकुमार, आपण एकटे असूनही स्वतःच्या जीवनोद्देशांच्या, आत्मज्ञानाच्या इतके निकट आहात की स्वतःतील अनेकानेक संभावनांचा शोध घेत, आपण स्वतःच्याच खूप, खूप जवळ आला आहात. आज आपल्या परिपूर्ण जीवनाकडे पाहिले की पटते, एकाकीपणही संपूर्ण असू शकते. आपल्या यशाच्या, सफलतेच्या तेजात झगमगणारे माझे मराठीपण अभिमानाने फुलून गेले आहे. "हार्दिक अभिनंदन" या माझ्या मनःपूर्वक शब्दांच्या मनात आज खरोखरी त्रिभुवन मावेनासे झाले आहे. या क्षणी जनन्नियतांच्या चरणी, माझी कृतज्ञता व्यक्त करताना मी म्हणते आहे की, हे विधात्या तुझ्या शक्तिची अथांगता वाचता यावी म्हणून इवल्या, इवल्या तुटलेल्या ओठांना, टाळूला चिकटलेल्या जिभांना इच्छित बोलके रुप देणाऱ्या डॉ. दीक्षितांच्या प्रेमळ करयुगांना धन्वंतरी स्पर्शाचे वरदान दिलेस म्हणून आजन्म व मरणोत्तरही, मी तुझी ऋणी आहे.

पंढरपूरला जन्मलेल्या या वारकऱ्याची वारी चंद्रभागेच्या वाळवंटातून निघाली व देवकृपेने या दिंडीच्या यशात दशदिशा सामावल्या आहेत, हे सर्वश्रुत सत्य आहे की ताकदीचा दर्दी गायक, वाद्यांच्या साथीविनाही, हृदयाचा आत्म्याशी समन्वय होईपर्यंत तन्मय होऊन गाऊ शकतो. एकच खंत आहे मनात की डॉ. दीक्षितांच्या १७% चालणाऱ्या हृदयाचा ८३% भाग बनणे मराठी मनाला जमले नाही. त्यांचा हरवलेला आवाज बनून त्यांच्या या सेवायज्ञ दिंडीत मनोभावे सामील होऊन मानवतेच्या जयघोषाने आकाश व्यापणे मराठी बाण्याला पूर्णतया जमले नाही.

असे म्हणतात, एकदा भृगु ऋषी शुक्राला म्हणाले, "माझ्या दृष्टिने, संपूर्ण सृष्टीचे अवलोकन केले. प्रत्येक व्यक्तीचा जन्म मृत्युक्षण, आयुमर्यादेचे रहस्यही मी उमगू शकलो पण एक रहस्य, एक कोडे मला अजून उलगडले नाही. ते हे की अश्रूचे वय किती असते? तो कोठून येतो व कोठे जातो? व्यक्तीचे डोळे किती अश्रूंना झेलू शकतात? किंवा असे असते का, की अश्रू एकच असतो जो व्यक्तीच्या डोळयात पुन्हा, पुन्हा जन्म घेतो? आणि म्हणतात, संभ्रमित होऊन भृगु ऋषींकडे पाहाणाऱ्या शुक्राच्या डोळयात एक अश्रू आला. नंतर ऋषींनी आपल्या लेखणीकडे पाहिले जी लेखणी डोळयात आलेल्या अश्रूचे अक्षर बनवित होती व त्या अक्षराकडे पाहून हळूच हसत होती. मला वाटते, भृगु ऋषींनी आपल्या लेखणीने अश्रूंची जी पहिली अक्षरे बनविली असतील, त्या अक्षरांतून 'अमृतपुत्र शरदकुमार' हेच नाव उमटले असेल, आणि लेखणी समाधानाने मधुर हसली असेल. त्यामुळेच या सौंदर्यविशारदाची ही यात्रा, व्यंगाच्या दर्शनाने व्यथित झालेल्या मुलामुलींच्या अश्रूंच्या जाणिवेचा प्रवास बनली आहे.

आज भृगु ऋषींच्या पहिल्या तीन प्रश्नांची उत्तरे देणारे डॉ. दीक्षित यांचे समर्पित जीवन माझ्या डोळयांसमोर आहे. अश्रूंचे वय असते, डॉक्टरांनी, रुपाचे दान दिलेल्या, लहानग्यांच्या डोळयात दाटलेल्या आनंदाश्रूंइतके, डॉक्टर शदरकुमारांसारख्या सहृदय व्यक्तिच्या हृदयात अश्रूचा जन्म होतो व तोच अश्रू दुःखितांच्या व्यथेची जाणीव बनून त्यांचे डोळे पुसतो. अशा तपस्वी व्यक्तीचे डोळेच अगणित अश्रूंना सहजपणे झेलू शकतात. शेवटचा प्रश्न, असे असते का की, अश्रू एकच असतो जो व्यक्तीच्या डोळयात पुन्हा, पुन्हा जन्म घेतो? या प्रश्नाच्या उत्तराच्या शोधात मात्र मी मानवतेचा वारसा सांगणाऱ्या प्रत्येकाकडे पाहते आहे. डॉ. दीक्षितांच्या या 'जाणिवेच्या' अश्रूने निदान भारतीयांच्या मानवीय डोळयांमध्ये, हृदयांमध्ये पुन्हा पुन्हा जन्म घ्यावा या माझ्या इच्छापूर्तीतच या कर्मयोगी सौंदर्यविशारदाचा खराखुरा सन्मान होणार आहे.

उषादेवी विजय कोल्हटकर.<br>(पूर्वप्रसिध्दी : 'स्नेहदीप' जानेवारी २०१२)